International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# नजूबाई गावित यांच्या, 'नवसा भिलनीचा एल्गार' मधून व्यक्त होणारे आदिवासी जीवनातील विदारक सत्य एक आकलन

**श्रीम. शैलजा सटवा ओव्हाळ[1], प्रो. डॉ. मनोहर शिरसाट[2]**
*[1]संशोधक, प्राथमिक पदवीधर, जि. प. प्रा. शा. बहिरवाडी*
*[2]संशोधक मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्र, बलभीम महाविद्यालय बीड.*
*Corresponding Author – श्रीम. शैलजा सटवा ओव्हाळ*
**DOI - 10.5281/zenodo.17662058**

नजुबाई म्हणजे आदिवासी समाजाला लाभलेलं एक परिवर्तनवादी नेतृत्व. जगातील पहिली आदिवासी महिला लेखिका, म्हणून तर त्यांची कर्तबगारी मोठीच आहे. परी स्थितीशी सामना करत, आपल्या उपेक्षित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नजुबाई म्हणजे एक लढवय्यी आणि जिद्दी व्यक्तिमत्त्व.

भारतीय साहित्यविश्वात अतिशय सशक्त आणि प्रतिभासंपन्न साहित्यिका म्हणून नजूबाई गावित यांचे नाव घ्यावे लागेल. आदिवासींचे भावविश्व त्यांनी आपल्या साहित्यातून साकारले, त्यांनी केवळ आदिवासी स्त्रियांसाठी नाही, तर समग्र वंचित, शोषित, उपेक्षित, पीडित, कष्टकरी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी एक धडाडीच्या कार्यकर्त्या म्हणून त्या चळवळींमध्ये अग्रेसर राहिल्या. नजूबाई गावित यांचा जन्म १० जानेवारी १९५० रोजी महाराष्ट्रातील बोद्रेपाडा येथे एका भूमिहीन मावची आदिवासी कुटुंबात झाला. दळणवळणाची साधने, रस्ते, वीज, आणि शिक्षण अशा मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या दुर्गम पाड्यात, दारिद्र्य आणि संघर्ष यांच्या सावटाखाली त्या वाढल्या. मोठ्या कुटुंबाचा भार आणि प्रतिकूल परिस्थिती असूनही, चौथीपर्यंत शिक्षण घेतल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आत्मभान जागृत झाले. लग्नानंतरही गरिबीशी झगडत त्यांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. मात्र, त्यांच्या स्वभावातील अन्यायाविरोधातील ठिणगी कधीच विझली नाही. शरद पाटील यांच्या सहवासाने त्यांना एका नव्या विचारधारेची ओळख झाली आणि त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडले. देश स्वतंत्र झाल्यानंतरही आदिवासी समाज विकासाच्या मंगलम प्रवाहापासून वंचित होता. त्यांचे शिक्षण, आरोग्य, आणि हक्कांबाबत होणारे शोषण नजूबाईंना अस्वस्थ करत होते. त्यांनी आदिवासी, भूमिहीन शेतकरी, आणि उपेक्षित घटकांसाठी आवाज उठवला. त्यांनी १९७४ मध्ये 'धुळे जिल्हा श्रमिक महिला संघा'ची स्थापना केली आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. मात्र, १९७८ मध्ये जातीच्या प्रश्नांवर त्यांनी पक्षाचा राजीनामा देऊन 'सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष' आणि 'सत्यशोधक कष्टकरी महिला सभा' यांची स्थापना केली. महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यापासून ते आणीबाणीच्या काळात स्थानबद्ध होईपर्यंत त्यांनी अनेक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी १९८६ साली ‘दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य महासभे’ची स्थापना करून सामाजिक व सांस्कृतिक जागृतीचे काम केले. १९९८ मध्ये सटाण्याला भरलेल्या दलित-आदिवासी साहित्य संमेलनात त्यांनी ‘अब्राह्मणी साहित्य व कला महासभे’ च्या स्थापनेची घोषणा केली. त्यांनी साहित्य आणि कलेच्या माध्यमातून वंचित समाजाला नवी दिशा दिली. नजूबाई गावित या राणी दुर्गावतीसारख्या लढवय्या कार्यकर्त्या ठरल्या. कमी शिक्षण, दारिद्र्य, आणि विपरीत परिस्थिती असूनही त्यांनी आपल्या विचारांची प्रगल्भ मांडणी केली आणि वंचित, शोषित समाजासाठी नजूबाई दिशादर्शक ठरल्या. ‘लढवय्या कार्यकर्ता’ असा नजूबाईंचा पिंड असल्यामुळे त्या राजकीय पक्ष, प्रसिद्धी आणि पदांपासून लांबच राहिल्या. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने १३ वे विद्रोही साहित्य आणि संस्कृती संमेलन २३-२४ डिसेंबर २०१७ ला नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे आयोजित केले होते. या संमेलनाच्या अध्यक्षपदी नजूबाईंची निवड करण्यात आली. नजूबाईंनी स्वीकारलेले हे समाज परिवर्तनाचे कार्य आजतागायत सातत्याने चालू आहे.

‘नवसा भिलनीचा एल्गार’ हा नजुबाई गावितांचा कथासंग्रह ‘जवानीमा किसबीण, धडपण मा डाकीण’ ‘भी होर ना नदी सय’ ‘बांबूची मोळी’ ‘जानकीची सीता’ ‘कुतरखांब’ ‘भुताळ्या’ आणि ‘नवसा भिलणीचा एल्गार’ या सात कथांच्या माध्यमातून आदिवासी विश्व उभे करते. नजूबाई गावितांच्या कथेमध्ये भील्ल व मावची आदिवासींचे चित्रण आले आहे.

त्यांची ‘जवानिमा किसबीण धडपणमा डाकीण’ ही पहिली कथा धुळे, नंदुरबार जिल्हातील ‘डाकीण’ या प्रथेवर बेतली आहे.या कथेतून आदिवासी स्त्रीच जीवन आणि अंधविश्वासातून स्त्रियांवर होणारा अन्याय, टोकाच्या शारीरिक यातना देणाऱ्या शिक्षा या सगळ्या समाजविघातक प्रथा या कथेत लेखिकेने मांडल्या आहे. ‘मी होर ना, नदी सय’ ही कथा अनैतिक संबंधावर चित्रित केली आहे. तर ‘बांबूची मोळी’ पोटापाण्याचा प्रश्न मानवाला मृत्यू पर्यंत घेवून जातो हे सत्य मांडते.

‘जानकीची सीता’ ही कथा व्यसनी नव-याच्या अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रीची करुण गाथा आहे. जानकीची सीता’ या कथेतील जानकी तिचा नवरा आत्म्या (आत्माराम) पानपाटील याच्या दारूडेपणाला आणि सततच्या मारझोडीला कंटाळून माहेरी येते, आणि माय बापाला सांगू लागते, “रोज कितला मार खाऊ? मा, घर खावाले नई, रातभर मार खावा, आन् दिवसभर मजुरीले जावा. वावर वतं तेबी गाहान ठी दिदं, आन रोज दारू पीन मारस. मी आते नई जानार दादा, कितली हाल भोगू मी?”१ साऱ्या समाजव्यवस्थेलाच विचारलेला प्रश्न आहे तो. नजूबाईच्या लिखाणातून मोठ्या परिणामकारकतेने मांडला गेला आहे. बाळंतपणानंतर सहाव्या दिवशीच लोकांच्या घरी धुणी-भांडी करायला जाणारी, स्वतःच्या दोन्ही मुलींवर बलात्कार करणाऱ्या नवऱ्यापासून सुटका करून घेण्यासाठी, डोक्यावर नवऱ्याने काठी मारल्यामुळे झालेली भळभळणा‍री जखम घेऊन दोन पोरींसकट घराबाहेर पडणारी आणि शेवटी नवऱ्याचे अत्याचार पराकोटीला पोहचल्याने वेडी झालेली जानकी! तिला विसरू म्हणता विसरता येणार नाही. अंधारात गडप होत जाणारा तिचा आक्रोश आपल्यालाही ऐकू येत राहतो.आपल्या मुलीवरच वाईट

नजर ठेवणारा बाप, अन्याय, अत्याचार या कथेत पाहायला मिळते.

'कुतरखांब' ही कथा प्राणी व मानवाच्या विरोधभासावर बेतली आहे. या कथे विषयी प्रस्तावनेमध्ये रुपा कुलकर्णी लिहितात, "कुतरखांब ही या कथासंग्रहामधली अत्यंत चटका लावणारी गोष्ट, जो हरी वाणी गोमाला जिवंतपणी इतका त्रास देतो, खोटेपणाने त्याचे सर्वस्व हडपतो, अन्नाला मोताद करतो, तोच आपल्या कुत्र्याच्या मरणानंतर मात्र त्याच्या नावाची जत्रा भरवतो. या विरोधाभासावर ही कथा लेखिकेने संपवली आहे प्राण्यांपेक्षाही मानवाकडे वाईट नजरेने पाहणारे जमीनदार या कथेत पाहायला मिळतात."२

'भुताळ्या' या कथेत आदिवासींचा अंधविश्वास आपल्याच बांधवांसाठी किती घातक आहे हे सांगण्याचे धैर्य नजुबाई गावित यांनी केले आहे 'भुताळ्या' ही कथा अंधश्रध्देतून नरकयातनामय होणाऱ्या जीवनाचे दर्शन घडविणारी कथा आहे. आदिवासी भगताची समाजावर असणारी पकड, त्याची न्याय करण्याची पध्दती, त्याची शिक्षा देण्याची अघोरी पध्दत आणि स्वार्थासाठी अशा भगताकडून लोकांचा केला जाणारा छळ याची मांडणी या कथेत केली आहे.

या कथेतील भीका व नायजा या शेतकरी कुटूंबाचे बैल मेल्यामुळे त्यांचा संसार उद्ध्वस्त होतो. भिकाच्या बैलावर कुणीतरी करणी करुन ते बैल मारलेत अशी समजूत कारभारी दाजीची होते. कारभारी या गोष्टीचा छडा लावण्यासाठी मंगळ्या भक्ताकडे जाण्याचे ठरवितो. सगळे पुरुष भाकरी बांधून मंगळ्या भक्ताकडे जातात. मंगळ्या भगत त्या परिसरातला नावाजलेला भगत असतो. पोलीसही त्याला पकडत नसतात. सगळे मंगळ्या भगताकडे येतात. दाजी घडल्या गोष्टीचा छडा लावावा म्हणून मंगळ्याला विनंती करतो. पण बैल मारणारे मोगर विद्यावाले आहेत तुमच्या गावी येऊनच या गोष्टीचा छडा लावावा लागलं असं मंगळ्या सांगतो आणि सारे सावरीपाड्यात आले. सर्व स्त्रीपुरुषांना एकत्र करून मंगळ्या आपल्या कामाला सुरवात करतो. "चोराला लपवू नको. सगळ्यांच्या पुढे घडा पाड जो चोर असेल त्याला गय करू नको" (पृ. ६०)३ असं म्हणणाऱ्या शिड्याला मंगळ्या बाजूला काढतो. हसणाऱ्या बणालाही तो बाजूला बसवितो. सारी व गारी या दोघी बहिणींना तो बाजूला बसवितो व त्यांना शिक्षा द्यावी अशी कारभाऱ्याला विनंती करतो. कारभारी या स्त्रियांच्या नवऱ्यांना नामदेव, सखाराम, गोविंदा व शिड्या यांना भिकाला नुकसान भरपाई व भगताचा खर्च उचलून द्यावा असे सांगतो. तो खर्च भार उचलायला तयार असतांनाही मंगळ्या भगत या स्त्रियांना व शिड्याला अघोरी शिक्षा देतो. त्यांनी न केलेल्या पापाची त्यांच्याकडूनन कबुली घेतो. पुन्हा त्यांनी सांगितलेले मेंढी, बकरीचे बळी द्यायला लावतो. ऐवढ्यावरच तो थांबत नाही तर या सर्वांना कसलंस पाणी पाजतो यामुळे या स्त्रिया रडत राहतात. त्यांचे नवरेही त्यांना समजावून घेत नाहीत. सगळ्यांची नजर चुकवून मंगळ्याच्या हातात हळूच दाजी नोटा सरकवतो. मंगळ्याला पोहचवायला दोन-चार मुलं जातात. सखाराम आपली अनु गेली म्हणून बापाच्या गावाला जातो तर नामदेव आनलीला जातो. बणा व शिड्या हे चारपाच वर्षानंतर आंधळे होऊन मेले. सारी व गारी या दोघी बहिणी अजून बरळत फिरत राहतात. अगदी तरुण वयात दोघी बहिणी भुताळ्या ठरल्या. त्यांचा संसार उध्वस्त झाला. नामदेव व सखारामनं दुसऱ्या बायका केल्या नाहीत. मंगळ्या भगतानं स्वतःच्या स्वार्थासाठी या चारही जणांचे खूपच हाल केले व जीवनभर न सरणारी पिडा दिली.

'नवसा भिलनीचा एल्गार' ही कथा 'नवसा' चा संघर्ष अधोरेखित करते. त्यांच्या कथेविषयी संजय लोहकरे म्हणतात. "आदिवासी संस्कृती ही मानवतावादी, स्त्री -प्रधान, न्याय, स्वातंत्र्य समता या नैसर्गिक मूल्यांवर आधारलेली संस्कृती असा एका बाजूला डांगोरा पिटला जात असताना, नजुबाई गावितांच्या कथा मात्र समाज जीवनातील या वास्तवातून स्त्रियांवर अमानवी अन्याय, अत्याचार करणाऱ्या आणि नैसर्गिक मूल्यांना पायदळी तुडवणाऱ्या असल्याचे वास्तव मांडतात, हे समजून घेणे गरजेचे आहे."४ या विधानातून संजय लोहकरे यांनी आदिवासी समाजातील वास्तव व्यक्त केले आहे.याच कथेविषयी कथासंग्रहच्या प्रस्तावबेत रूपा बोधी कुलकर्णी म्हणतात, " नवसाचा एल्गार साऱ्या कष्टकरी महिलांचा व स्त्रीसत्तेचा एल्गार बनण्याचं सामर्थ्य हा कथासंग्रह देऊन जातो."५

**जात पंचायत आणि आदिवासी स्त्री:**

आजही आदिवासी स्त्रीला जात पंचायतीचा सामना करावा लागतो. त्यांनी दिलेले अन्याय निकाल स्वीकारावे लागतात. 'जवानिमा किसबीण धडपणमा डाकीण' या कथेत मुलं होत नाहीत म्हणून तानकूबाई ला तिचा स्वतःचा नवरा ५०० रुपयांना टोळभैरवाना विकून टाकतो. त्यांच्यापासून कशीबशी सुटका करून ती आई कडे जाऊन राहते. पण जात पंचायत तिला रामभाऊ कडे परत जायच नसेल तर ६५ रुपये तिच्या सासऱ्यांना देण्याचे सांगितले. तानकूबाईच्या आई ने मुदत देण्याची विनंती पंचांनी फेटाळून लावली आणि उलट पैसे देईपर्यंत तानकूच्या पायात लाकडी अवजड खोडे घालून तिला बंदी केल. अश्यारीतीने जात पंचायत देईल तो निर्णय स्वीकारणे आदिवासी स्त्रियांना बंधनकारक होते.

**नजुबाई गावित यांच्या लेखनातील आदिवासी, मावची बोली:**

नजुबाई गावित यांनी आपल्या साहित्यामध्ये प्रामुख्याने मावची बोलीचा समर्थपणे वापर केलेला दिसतो. त्यांच्या 'तृष्णा' या आत्मकथनामध्ये अनेक लोकगीतं, रूढी, परंपरा ज्या रेखाटले आहेत त्या मावची बोलीतील आहेत. उदा. लग्नविधी मध्ये नवरा-नवरीची अंघोळ झाल्यानंतर ते कपडे बदलतात त्यावेळी एक गीत म्हटले जाते ते असे.

मसूरी लुगडा खोयटी काढे वा बेना ।
उकीडे चिंधडी कासडी काम रा लवंडा ॥

वरील ओळींचा असा अर्थ होतो की, नवरी जशी मसराइज् लुगडं नेसलेली. नवरा जसा उकिरडयावरच्या चिंध्या नेसलेला. आदिवासी बोलीचे खरं रूप पाहायचं असेल तर लिखित साहित्यापेक्षा मौखिक साहित्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये दिसते. नजुबाई गावित यांच्या 'आदोर', 'नवसा भिलणीचा एल्गार', 'भिवा फरारी' या कलाकृतीमंधून देखील आदिवासी बोलीचा प्रत्यय आलेला आहे.

नजूबाई गावित यांचे जीवन म्हणजे अन्यायाविरोधातील संघर्षाची जाज्वल्य प्रेरणा आहे. त्यांनी समाज परिवर्तनाच्या प्रत्येक टप्प्यावर कणखरपणे उभे राहून सामाजिक न्यायाचा नवा अध्याय लिहिला आहे.आधी नजूबाईमधील कार्यकर्ती घडली. या कार्यकर्तीनं जे विश्व पाहिलं, अनुभवलं त्यातून त्यांच्यातील लेखिका घडत गेली.

**निष्कर्ष :**

नजूबाई गावित यांच्या, 'नवसा भिलनीचा एल्गार' या कथा संग्रहातील कथाचा अभ्यास केल्यावर खलील निष्कर्ष आपण काढू शकतो.

१) आशयघन स्वरूपामुळे नजूबाई यांनी लिहिलेल्या आदिवासी कथा अस्तित्ववादी वाटतात.
२) निसर्ग व आदिवासी समुदाय यांचा अनुबंध नजूबाईच्या कथेमध्ये चित्रित झाला आहे.
३) दारिद्रय , भूक, शोषण, विस्थापन, वेठबिगारी, हे सगळ्या सामाजिक संदर्भ असलेल्या समस्या आदिवासी जीवनात कशा प्रकारे डोकावतात, यांचे वास्तव चित्रण नजूबाईनी याकथामध्ये मांडले आहे.
४) बोलीच्या वापरामुळे कथेचा आशय अधिक संपन्न व वैशिष्ट्यपूर्ण पूर्ण झाला आहे.
५) मानवी मूल्ये, निसर्ग जाणीवा, भूतदया, शेती संस्कृती, श्रध्दा या आदिवासी जीवनाशी निगडित विषयाला नजूबाईच्या कथा स्पर्श करतात.
६) आदिवासी स्त्रीची होणारी पिळवणूक, तिचा मानसिक आणि शारीरिक पातळीवर होणारा छळ या कथामधून व्यक्त झाला आहे.
७) नजूबाई या स्वतः आदिवासी समाजातील लेखक असल्यामुळे वास्तवाचे भान व तळमळीने कथा लेखन झाले आहे.

**संदर्भ :**


१) रूपा बोधी कुलकर्णी, नवसा भिलणीचा एल्गार, प्रस्तावना सुगावा प्रकाशन पुणे. पृ.क्र.५
२) तत्रैव
३) नजूबाई गावित, नवसा भिलनीचा एल्गार, सुगावा प्रकाशन पुणे, पृ. क्र. ६०
४) संजय लोहकरे चळवळ आणि साहित्य, मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती पृ.क्र. ९३
५) रूपा बोधी कुलकर्णी, नवसा भिलणीचा एल्गार, प्रस्तावना सुगावा प्रकाशन पुणे. पृ.क्र.७